आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १२९ वा ● मंगळवार दि. १५ ऑक्टोबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अभिनेता अतुल परचुरे यांना श्रद्धांजली



मुंबई– हरहुन्नरी, अभिनय संपन्न अभिनेते अतुल परचुरे यांची अकाली एक्झिट मनाला चटका लावून जाणारी आहे. त्यांच्या निधनामुळे एका गुणी कलाकाराला आपण मुकलो आहोत, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिनेता अतुल परचुरे यांना श्रद्धांजली वाहिली आहे.शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, बालरंगभूमी पासून त्यांची अभिनयाची कारकीर्द सुरू झाली. त्यांनी मराठी रंगभूमीवर आपल्या सहज, टवटवीत अभिनयाने छाप उमटवली. मराठी आणि हिंदी अशा दोन्हीतील नाटक, मालिका चित्रपट आणि जाहिरात या क्षेत्रांत त्यांनी ओळख निर्माण केली. शाब्दिक, वाचिक विनोद यांमध्ये त्यांनी अंगभूत गुणांनी रंग भरले. त्यांच्या निधनामुळे एक गुणी, अभिनय संपन्न कलाकाराला आपण मुकलो आहोत. ही कला क्षेत्राची मोठी हानी आहे. परचुरे यांच्या असंख्य चाहत्यांपैकी एक म्हणून मी त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात सहभागी आहे.

## महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय,नॅब , रोटरी व राजस्थानी महिला मंडळ, लातूर याच्या वतीने भव्य नेत्रदान रॅलीचे आयोजन

लातूर :येथील महात्मा बसेश्र्वर महाविद्यालय नॅब,रोटरी राजस्थानी महिला मंडळ च्या संयुक्त विद्यमाने उद्या दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी भव्य नेत्रदान रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहासमोर सकाळी १०:०० वाजता नेत्रदान रॅलीच्या उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला. आहे डॉ. श्रीधर पाठक डॉ.अर्चना भोसले उपसंचालक आरोग्य सेवा लातूर परिमंडळ,डॉ. दिलीप ढेले, जिल्हा शल्य चिकित्सक, अनमोल सागर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रॅलीला हिरवे झेंडे दाखवण्यात येणार आहेत .

महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, गांधी चौक, गंजगोलाई, भांडी गल्ली, सुभाष चौक, भालचंद्र ब्लड बँक, मध्यवर्ती टपाल कार्यालय या मार्गाने महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाचे एमसीव्हीसी सभागृहात या रॅलीचा समारोप होणार आहे. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थान नॅबचे अध्यक्ष विजयभाऊ राठी हे भूषवणार असून कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून श्री. महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे ,प्राचार्य डॉ.संजय गवई आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

नेत्रदानाचे मानवी जीवनातील महत्त्व लक्षात घेऊन राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत आयोजित या नेत्रदान महारॅलीत लातूर शहरातील नागरिकांनी, विद्यार्थी, विद्यार्थिनींनी सहभागी व्हावे असे आवाहन नॅब चे अध्यक्ष रो डॉ. विजय राठी,रोटरी क्लब ऑफ, लातूर अध्यक्ष पांडे महादेव शेषराव, सचिव स्वामी नीळकंठ, प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गवई, डॉ. गुणवंत बिराजदार ,राजस्थानी महिला मंडळ, लातूरच्या अध्यक्ष सौ अनिता सारडा, उपप्राचार्य प्रा.बालाजी जाधव डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, डॉ दिनेश मौने,डॉ. विजयकुमार सोनी, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ मनोहर चपळे ,डॉ. शिवप्रसाद डोंगरे प्रा. किसनाथ कुडके, प्रा.आशिष क्षीरसागर, प्रा. विष्णू ततापुरे, डॉ.सुजित हंडीबाग, श्री. नामदेव बेंदरगे आदींनी केले आहे.

## चन्नबसवेश्र्वर फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावरील परिषदेचे आयोजन

लातूर : लातूर येथील चन्नबसवेश्र्वर फार्मसी महाविद्यालयात बुधवार, दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि असोसिएशन ऑफ फार्मसी टीचर्स ऑफ इंडियाच्या वतीने ' फार्मास्युटिकल प्रॉडक्ट डेव्हलपमेंट' बाय टलऊ अप्रोच याविषयावर एक दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील परिषद आयोजित करण्यात आली आहे.

या राष्ट्रीय स्तरावरील परिषदेचे उदघाटन सकाळी १० वाजता संस्थेचे सचिव भीमाशंकर देवणीकर , प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. सुब्रह्मण्यम सी.व्ही.एस., प्रा. डॉ. एस.गी. गट्टाणी , निमंत्रक प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, कार्यक्रम समन्वयक तथा फार्मास्युटिक्स विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिवप्पा नागोबा, सह संयोजक प्रा.डॉ.ओमप्रकाश भुसनुरे, प्रा.डॉ.अनंत देशपांडे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. त्यानंतर पहिल्या सत्रात सकाळी ११ वाजता हैदराबादच्या गोकराजू रंगराजू फार्मसी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. सुब्रह्मण्यम हे ' उत्पादन विकासासाठी डिझाइननुसार गुणवत्ता' या विषयावर तर दुसऱ्या सत्रात स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाच्या स्कुल ऑफ फार्मसीचे वरिष्ठ प्रा. डॉ. एस.जी. गट्टाणी हे ' हर्बल उत्पादन विकासामध्ये क्यूबीडीचा वापर' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तर तिसऱ्या सत्रात डॉ. सुब्रह्मण्यम हे ' डीडी सॉल्व्हर आणि पीके सॉल्व्हर सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या राष्ट्रीय पातळीवरील परिषदेत भारतातील विविध विद्यापीठातील प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी होणार आहेत.




## मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेतून लातूर जिल्ह्यातील भाविक अयोध्या धाम तीर्थ यात्रेसाठी रवाना

लातूर : राज्यातील सर्व धर्मातील ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची, दर्शन घडविण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात लातूर जिल्ह्यातील जवळपास ८०० ज्येष्ठ नागरिक आज लातूर येथून रेल्वेने अयोध्या धाम येथे रामलल्लाच्या दर्शनासाठी रवाना झाले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून तीर्थ यात्रेला सुरुवात करण्यात आली. पालकमंत्री गिरीश महाजन यांनी तीर्थ दर्शन यात्रेला जाणाऱ्या भाविकांसा पाठविलेल्या शुभेच्छा संदेशाचे यावेळी वाचन करण्यात आले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, तहसीलदार सौदागर तांदळे, सहकारी संस्था सहायक निबंधक श्री. गडेकर, आयआरसीटीसीचे गुरुराज सोना यावेळी उपस्थित होते.

साठ वर्षांवरील नागरिकांना विविध तीर्थक्षेत्रांचे दर्शन घडवण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरू केली आहे. लातूर जिल्ह्यातून या योजनेला



अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला आहे. आज या योजनेतून जवळपास ८०० भाविक अयोध्या येथे रामलल्लाच्या दर्शनासाठी जात आहेत. सहा दिवसांची ही तीर्थ दर्शन यात्रा १६ ऑक्टोबर रोजी अयोध्या येथे पोहचणार आहे. त्याठिकाणी दर्शन व एक दिवस मुक्काम करून १७ ऑक्टोबर रोजी परतीच्या प्रवासाला निघतील. या भाविकांना वातानुकुलीत रेल्वेतून प्रवास, भोजन, निवास आणि दर्शन व्यवस्था पुरविण्यात येत आहे. भाविकांच्या मदतीसाठी वैद्यकीय पथक, शासकीय कर्मचारी सोबत राहणार आहेत.

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेला लातूर जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या योजनेमुळे जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थ दर्शनाची संधी मिळाली असून सर्वजण अतिशय आंनदी वातावरणात या यात्रेत सहभागी झाले आहेत. या यात्रेत सहभागी प्रत्येकाची काळजी घेतली जाणार असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. तसेच तीर्थ दर्शन यात्रेत सहभागी झालेल्या सर्वांना राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनावतीने त्यांनी शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी तीर्थ दर्शन यात्रेत सहभागी झालेल्या भाविकांचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. तसेच या भाविकांशी संवाद साधून त्यांच्या भावना जाणून घेतल्या. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेमुळे आपल्याला रामलल्लाच्या दर्शनाची संधी लाभल्याचा आनंद यावेळी भाविकांनी व्यक्त केला. तसेच शासनाचे व प्रशासनाचे आभार मानले. पारंपारिक वाद्यांच्या गजरात भाविकांना घेवून जाणारी रेल्वे अयोध्या धामकडे रवाना झाली.

## दहा हजार वर्षात एवढे लाचार आणि लोचट सरकार झाले नव्हते - संजय राऊत

मुंबई : शिवसेना खासदार संजय राऊत यांनी आज पुन्हा एकदा राज्यातील महायुतीच्या सरकारवर सडकून टीका केलीय. ''राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दकी यांची शनिवारी गोळ्या घालून हत्या करण्यात आली. सिद्दकी हे राजकीय क्षेत्रातील महत्त्वाचे नेते होते. त्यांच्यावर रविवारी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. सरकारच्या दृष्टीनं ती महत्त्वाची व्यक्ती होती. म्हणून त्यांच्यावर तिरंगा लपेटण्यात आला होता. बाबा सिद्दकी हे जनमानसातलं एक महत्त्वाचं व्यक्तिमत्व होतं. अशा व्यक्तीची पोलीस बंदोबस्त असतानाही आणि तीन-तीन सिंघम या राज्याच्या मंत्रिमंडळात असताना त्यांची हत्या होते. या हत्येची जबाबदारी एका गँगनं घेतली आहे. पण त्यांच्या या हत्येला राज्याचे मुख्यमंत्री जबाबदार आहेत. त्यांनी खोके जर कमी केले असते. थापेबाजी कमी केली असती, बोल बच्चनगिरी कमी केली असती, कायदा आणि सुव्यवस्थेवर लक्ष दिलं असतं तर अशा घटना घडल्या नसत्या,'' असा संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे आणि महायुती सरकारवर



हल्लाबोल केला.

लाचार आणि लोचट सरकार - पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले की, या सरकारमध्ये कायदा आणि सुव्यवस्था नाही, राज्यातील गुन्हेगारी वाढली आहे, बलात्कार अत्याचार हे दररोज घडताहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीत रोज शेकडो निर्णय घेतले जाताहेत. जे निर्णय घेतले जाताहेत त्याच्यासाठी हे पैसे आणणार कुठून? आज राज्याची बाहेर चेष्टा केली जाते. केवळ निवडणुकीच्या धर्तीवर मोठमोठे निर्णय घेतले जाताहेत. यापूर्वी दहा हजार वर्षात असे सरकार झाले नव्हते. एवढे हे ददद सरकार आहे. यांना राज्यातील सुरक्षा, गुन्हेगारी याबाबत काही नाही. हे सत्तेसाठी मोठमोठे निर्णय घेताहेत. दहा हजार वर्षात एवढे नालायक, लाचार आणि लोचट सरकार झाले नव्हते. देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा गृहमंत्री हे महाराष्ट्राला लाज आणण्यासारखे आहे, अशी बोचरी टीका संजय राऊत यांनी महायुती सरकारवर केली.

आता गोळ्या घाला - बदलापूर घटनेत आरोपीला गोळ्या घातल्या, आता बिश्नोई गँगला पकडून त्यांना गोळ्या घाला. आपल्या एका सहकाऱ्याची हत्या होते. तुम्ही म्हणता आरोपी पकडले. पण काय खरं-खोटं बाहेर येईल. शिंदेंच म्हणाले होते ना की, मुंबईमध्ये गँग चालू देणार नाही. गुंडांची दहशत चालणार नाही. मी बघून घेईन. आता घ्या बघून. गुजरातमध्ये एटीएसचा ताब्यात असलेली व्यक्ती मुंबईतल्या एका हत्येची जबाबदारी घेते. (पान २ वर)..

## 'आधार सिडिंग' अभावी २५ हजार बहिणींचे पैसे अडकले बँकेतच !

अमरावती : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत जिल्ह्यातील सहा लाखांहून अधिक महिला आज पात्र ठरल्या असून, योजनेचा लाभ त्यांच्या खात्यात जमा होत आहे. पात्र ठरलेल्या बहिणींच्या खात्यात ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या दोन महिन्यांचे तीन हजार रुपये जमा होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र, जिल्ह्यातील तब्बल २५ हजार १८७ लाडक्या बहिणींची रक्कम त्यांचे 'आधार सिडिंग' नसल्याने अद्यापही खात्यातच अडकून पडली आहे. गेल्या महिनाभरापासून बँकांमध्ये महिलांनी केवायसी, आधार सिडिंगसाठी अर्ज केले आहेत. मात्र अनेकवेळा 'सर्व्हर डाऊन' असल्याने बँकांमध्ये गोंधळ निर्माण होत आहे.




लाडकी बहीण योजनेतील अनेक पात्र महिलांचे बँक खाते सिडिंग नसल्यामुळे अडचणी येत आहेत. त्यामुळे त्यांच्या खात्यावर जमा झालेले पैसे काढता येत नाहीत. आधीचे ४ हजार ५०० आणि आता जमा झालेले ३ हजार रुपये असे ७ हजार ५०० रुपये बँक खात्यात जमा झाल्याचे संदेशही महिलांना आले आहेत. मात्र, ते काढता येत नसल्याने महिला बँकांमध्ये गर्दी करीत असून अनेक ठिकाणी वाद होऊ लागले आहेत.

महिला व बालविकास विभागाकडे ७ लाख ३ हजार ३ महिलांचे अर्ज प्राप्त झाले. यापैकी अर्जाची पडताळणी करत ६ लाख ९२ हजार १७५ महिलांचे अर्ज मंजूर करण्यात आले. यात ३ हजार २३६ महिलांचे अर्ज कागदपत्रांअभावी फेटाळले, तर ३४० अर्जांची पडताळणी सुरू आहे. १ जुलैपासून सुरू करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत जुलै ते नोव्हेंबर या पाच महिन्यांचे प्रत्येकी १५०० रुपयांप्रमाणे दोन टप्यात ७५०० रुपयांचे अनुदान महिलांना प्राप्त झाले आहे. परंतु ३५ हजार ३७ हजार ४११ लाडक्या बहिणींचे अनुदान बँकेला 'आधार सिडिंग' नसल्याने थांबवण्यात आल्याचा अहवाल शासनाकडून जिल्हास्तरावर प्राप्त झाला होता. यातून आतापर्यत १२ हजार २२४ महिलांचे 'आधार सिडिंग' ची प्रक्रिया बँकांनी पूर्ण केल्याने आता त्यांच्याही खात्यात पैसे जमा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. परंतु अद्यापही २५ हजार १८७ महिलांची 'आधार सिडिंग' नसल्याने त्यांचे अनुदान मात्र थांबले आहे. या महिला बँकांमध्ये पायपीट करत आहेत. त्यामुळे बँकांमध्ये गर्दी वाढली आहे. सध्या 'आधार सिडिंग' व केवायसीची गर्दी बँकांमध्ये झाल्याने त्यांच्याकडून या प्रक्रियेला विलंब होत असल्याचे दिसून येत आहे.

## मांजरा परिवाराकडून शेतकऱ्याची लूट हेच साहेबांचे स्वप्न आहे का ? आ. रमेशआप्पा कराड यांचा सवाल

लातूर - मांजरा परिवारातील साखर कारखान्याच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्याची आडवणूक आणि पिळवणूक वर्षानुवर्ष सुरू असून मापात पाप, भावात पाप, तोडणीत पाप केले जात आहे. लातूर ग्रामीणच्या निष्क्रिय आमदाराविरुद्ध जनतेत प्रचंड नाराजी असून निवडणुका जवळ आल्याने संपूर्ण देशमुख कुटुंब गावोगाव फिरून स्वर्गीय विलासरावजी देशमुख साहेबांचे स्वप्न साकार करण्यासाठी माझ्या मुलाला पदरात घ्या असे भावनिक आव्हान त्यांच्या मातोश्री करीत आहेत. शेतकऱ्याची लूट हेच साहेबांचे स्वप्न आहे का असा जाहीर सवाल भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांनी केला आहे.

लातूर तालुक्यातील मौजे सावरगाव येथील ३ कोटी रुपये आणि मौजे अंकुली येथील २ कोटी ६७ लाख रुपये खर्चाच्या आमदार स्थानिक विकास निधी, केंद्र शासन, राज्य शासन यांच्या विविध विभागामार्फत मंजूर झालेल्या जल जीवन मिशन अंतर्गत हर घर नल नलसे शुद्ध जल, सिमेंट रस्ता नाली बांधकाम, विविध देवस्थानासमोरील सभागृह, पेव्हर ब्लॉक रस्ता, विद्युतीकरण यासह विविध विकास कामांचा लोकार्पण आणि भूमिपूजन सोहळा रविवारी सायंकाळी भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते करण्यात आला. दोन्ही गावात आमदार कराड यांचे आगमन होताच फटाके फोडून वाजत गाजत ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाच्या आणि जल्लोषाच्या वातावरणात स्वागत केले लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यात जमा झाल्याबद्दल अनेक महिलांनी आ कराड यांचा यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, संगायो समिती अध्यक्ष वैभव



सापसोड, जिल्हा उपाध्यक्ष विजय काळे, प्रताप पाटील, उमेश बेद्रे, अशोक सावंत, विश्र्वास कावळे, काशिनाथ ढगे, साहेबराव मुळे, सावरगावचे सरपंच धनराज शिंदे, अंकोलीचे सरपंच समाधान आडगळे उपसरपंच सुधाकर गवळी, बालाजी गवळी, सुरेखा मुळे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

विकास कामाच्या लोकार्पण आणि भूमिपूजन सोहळ्याच्या निमित्ताने गावकऱ्यांशी संवाद साधताना भाजपा नेते आ रमेशआप्पा कराड यांनी शासनाच्या विविध विभागाअंतर्गत मतदार संघातील प्रत्येक गावात लाखो नव्हे तर कोट्यावधीचा निधी विविध विकास कामासाठी मंजूर करून आणला असल्याचे सांगून केंद्र आणि राज्य शासनाने सुरू केलेल्या शेतकऱ्यांना मोफत वीज, लाडकी बहीण योजना, एक रुपयात पिक विमा, महिलांना प्रवासात सवलत, गरजूंना घरकुल, मागील त्याला गाय-गोठे, विहिरी, मोफत राशन,विविध कल्याणकारी योजनेची माहिती दिली. काँग्रेसच्या काळात तोंड बघून योजना दिल्या जात होत्या मात्र महायुतीच्या शासनाने जो गरजू आहे अशा पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला. या सर्व योजना पुढील काळातही कायम पणे सुरू ठेवण्यासाठी आणि आपली सर्वांची काळजी घेणाऱ्या महायुती शासनाला आशीर्वाद द्यावे असे आव्हान केले.

गेली अनेक वर्षापासून लातूर ग्रामीण मतदारसंघात उसाच्या टिपऱ्याचे राजकारण केले जात असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सातत्याने वेठीस धरण्याचा प्रयत्न सुरू आहे सहकारी साखर कारखाने ही देशमुखची जहागिरी नाही तर शेतकरी सभासदाच्या मालकीच्या आहेत. मांजरा परिवारापेक्षा गुळ पावडर कारखाने ऊसाला अधिक भाव देत आहेत. मशीनने तोडणी करून गाळपास आलेल्या उसात पाचटाचे प्रमाण अधिक असल्याचे सांगून कपात केली हे प्रकरण अंगलट येणार लक्षात आल्यानंतर शेतकऱ्यांना पाचट कपातीचे पैसे दिले. पैसे द्यायचेच होते तर कपात का केले असा प्रश्र्न उपस्थित करून आ रमेशआप्पा कराड म्हणाले की, मागील गळीत हंगामात कार्यक्षेत्रात हक्काचा मुबलक ऊस असताना गेटकींचा आणून शेतकऱ्याचा ऊस का वाळविला? केंद्र शासनाने रिकव्हरी बंधनकारक केल्यापासून बारा तेरा येणारी ऊसाची रिकव्हरी आता का कमी होऊ लागली? ऊस तोच, शेतकरी तोच, जमीन तीच, मग काय पाण्यात बदल झाला का कशात? शेतकऱ्यांच्या पैशाची लूट करायची आणि कळवळा दाखवायचा हे यापुढे चालणार नाही. शेतकऱ्यांनीही आपल्या न्याय हक्कासाठी पुढे आले पाहिजे.

निवडून गेलेल्या काँग्रेस आमदाराला जनतेशी काहीही घेणेदेणे नाही कधी कोणाला भेटत नाही विकास कामासाठी निधी आणण्याचा प्रयत्न केला नाही मात्र काहीच न करता हे मी केलं हे माझ्यामुळे झाले असे सांगून श्रेया लाटण्याचा प्रयत्न मात्र केला जात आहे गेल्या पंधरा वर्षात काँग्रेसच्या आमदारांनी कुठल्या कामाला किती निधी आणला याचा हिशोब जनतेसमोर द्यावा आणि चार वर्षात मी कोणती कोणती विकास कामे केली याचा जनतेसमोर हिशोब द्यायला तयार आहे एकदा होऊनच जाऊ द्या दुधाचे दूध आणि पाण्याचे पाणी असेही आ कराड यांनी बोलून दाखवले. काँग्रेसच्या भूलथापांना आणि खोट्या आश्र्वासनाला बळी न पडता येणाऱ्या निवडणुकीत लोक कल्याणकारी जनहिताच्या योजना सुरू करून सामान्य जनतेसह नागरिकांना दिलासा देणाऱ्या महायुती शासनाला आशीर्वाद द्यावेत असेही आव्हान त्यांनी केले.

सावरगाव येथील कार्यक्रमात सरपंच धनराज शिंदे यांनी तर अंकोली येथील कार्यक्रमात साहेबराव मुळे यांनी आ रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून गावातील विविध विकासासाठी मिळालेल्या विकास कामासह निधीची माहिती दिली. दोन्ही गावातील आणि त्या त्या परिसरातील सर्व स्तरातील नागरिक महिला पुरुष भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# झरोका

एक – महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री कोण असे ठाकरे सेनेचे खासदार राउत म्हणत असताना अचानक पणे उध्दव ठाकरे यांनी महायुतीचा चेहरा दाखवा असे म्हटल्यामूळे महायुती, महाविकास आघाडी जुपंतेकी काय, अशीच शंका येते आहे. पण मुख्यमंत्री मलाच करावे असे म्हणणाऱ्या ठाकरे यांनी दिशा कशी काय बदलली, याचे आश्चर्य वाटते. कांहीच कळत नाही, डोकं बधीर झालं आहे.

दुसरा – अरे, महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री निवडणूकी नंतरच ठरेल असे शरद पवार यांनी जाहिर केल्यामुळे उध्दव ठाकरे यांनी वाद नको म्हणून महायुतीलाच पलटवार करुन महायुतीचा चेहर कोण असा उलट सवाल केल्यामूळे राजकीय बदल घडत असला तरी कॉंग्रेस उध्दव सेनेला शरद पवार यांच्या राजकीय खेळी शिवाय दुसरा पर्याय नाही. हेच सिध्द होते.

एक – अहो, शरद पवार यांना चढवून चालणार नाही. कारण महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने कॉंग्रेसचे राहूल गांधी, प्रियंका गांधी, मल्लीकार्जून खरगे, हे महाराष्ट्रात येणार असून शरद पवारांच्या बरोबरीने ते महाराष्ट्र पिंजून काढणार असल्यामूळे महाविकास आघाडी असे कमीजास्त लेखणे चुकीचे वाटते म्हणून बालतो आहे.

दुसरा – अरे, तसे कांही नाही, महायुती मध्ये शिंदे गट आणि फडणवीस गट, अजित पवार गटाला दुय्यम स्थान देवून गळचेपी करु पाहात आहेत, त्यामूळे उध्दव ठाकरे यांनी महायुतीचा चेहरा कोण अशी ठिणंगी टाकून शिंदे, फडणवीस यांच्यात आग लावण्याचा प्रयत्न केला असावा, त्यामूळे उध्दव ठाकरे यांच्या भुमिकेला महत्व देण्याची गरज नसावी कारण शरद पवार यांनी महाविकास आघाडीला ज्या गटास जास्त जागा मिळतील त्यांचाच मुख्यमंत्री होईल हे स्पष्ट केल्यामूळे ठाकरे मुख्यमंत्री होणारच नाहीत. आणि महायुतीला ते परवडणारे नाही. म्हणून अशा राजकीय वावड्याना महत्व देण्याचे गरज नाही. हे लक्षात ठेव.

# काय बोलता राव ?

महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत राजरंग अधीक प्रकट झाल्यामूळे महायुती आणि इंडिया महाविकास आघाडी सत्तेसाठी संघर्ष चालू आहे. जरांगे यांनी सरकारला आव्हाण दिले असतानाच राज ठाकरे यांनी स्वबळाचा संदेश जारी केलेला आहे. त्यात बच्चूकडू आघाडीची भाषा बोलत असले तरी प्रकाश आंबेडकर हे वेगळ्या भुमिकेत दिसतात. त्यामूळे महाविकास आघाडीला चांगले दिवस येतील अशी कुजबूज सुरु असताना महायुती मध्ये केंद्रीय मंत्री असलेले आरपीआयचे रामदास आठवले मात्र महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत रिपाइंला जागा मिळोत किंवा नाही मिळाल्या तरी माझा पक्ष भाजपा महायुती मध्येच राहाणार असल्यामूळे जाहिर केले असल्याने आश्चर्य वाटते.

## काय बोलता राव,

अरे, लोकसभा निवडणूकीत तीन लोकसभेच्या जागा रामदास आठवले यांनी मागीतल्या होत्या परंतू महाराष्ट्रातील त्यांचे बळ कमकुवत असल्यामूळे महायुतीने त्यांना दाद दिली नाही. आजघडीला महाराष्ट्र विधानसभेच्या नऊ मतदार संघावर रामदास आठवले दावा करीत आहेत, परंतू महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत जागा मिळाल्या काय, आणि नाही मिळाल्या तरी मी केंद्रीय मंत्री असल्यामूळे विधानसभा उमेदवारीचा विचार न करता महायुतीत कायम स्वरुपी राहाणार आणि केंद्रा प्रमाणे महाराष्ट्रातील सरकार ही महायुतीचेच सरकार येणार असल्याचा दावा करुन रामदास आठवले यांनी रिपाइंचा आवाज केंद्रीय मंत्री पदाच्या गोधडीत दडवील्यामुळे राजकीय वर्तूळात उलटसूलट बोलबाला होत असला तरी रामदास आठवले यांच्या मंत्री पदाला धोका नाही, मग बोला दाजीबा !

## खेळताना चिमुकला पाय घसरुन तलावात पडला, त्याला वाचवण्यासाठी गेलेल्या भावाचाही मृत्यू

जळगाव : तलावाजवळ खेळत असलेल्या चिमुकल्याचा पाय घसरून तो तलावात पडला. आपल्या लहानग्या भावाला वाचवण्यासाठी गेलेल्या भावाचे प्रयत्न तोकडे पडले अन् या घटनेत दोन्ही सख्ख्या भावांना आपला जीव गमवावा लागला.जळगावमधील मुक्ताईनगर तालुक्यातील सालबर्डी येथील दोन सख्ख्या भावांचा तलावात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. दोन्ही भाऊ अल्पवयीन आहेत. या घटनेने परिसरावर शोककळा पसरली आहे.सालबर्डी येथे कृष्णा गोपाळ ढाके हे आपली पत्नी आणि दोन मुलांसह वास्तव्यास आहेत. कृष्णा ढाके हे रिक्षा चालक असून त्यांची पत्नी शेतमजूर आहे. त्यांची दोन मुले वेदांत कृष्णा ढाके (वय १५) हा इयत्ता नववीत शिकत होता. तर, चिराग कृष्णा ढाके (वय १०) हा इयत्ता पाचवीत शिकत होता. ही दोन्ही मुले सालबर्डी शिवारात बकऱ्या चारण्यासाठी गेले होते. त्यावेळी चिराग हा शिवारातील तलावाजवळ बकऱ्या चारत असताना त्याचा पाय घसरल्याने तो तलावात पडला. त्याला पोहता येत नसल्याने तलावातील पाण्यात तो बुचकाळ्या खाऊ लागला. त्याला वाचवण्यासाठी त्याचा भाऊ वेदांत याने देखील पाण्यात उडी मारली. दुर्दैवाने पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने दोन्ही भाऊ तलावात बुडाले. या घटनेत दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला.या घटनेबद्दलची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. दोघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आल्यानंतर मुक्ताईनगर उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणाची अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# विजयादशमीमुळे मेळावे व चुली पेटल्या !

## संपादकीय...

हिंदूंचा दसरा आणि आंबेडकरी जनतेची विजयादशमी एकाच दिवशी येत असते. विजयादशमीच्या मुर्हतावर वाढूलागलेले विविध राजकीय मेळावे आणि १४ ऑक्टोबर रोजी १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी स्विकारलेला बौध्द धर्म हा सुदीन असतो. कारण हिंदूचे सिमोलंगन आणि दिक्षाभुमीवरचा विजयादशमी दिनी बौध्द धर्मीय सिमोलंगन हिंदू धर्माचा त्याग करुन बाबासाहेबांनी नवा इतिहास निर्माण केला. सुमारे चारदशके याच दिवशी डॉ. हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वंयसेवक संघाची स्थापना केली. त्याला आज शंभर वर्ष पूर्ण होताना दिसतात त्यामूळे नागपूरची रेशीम बाग ते दिक्षाभुमी हे अंतर कमी करण्याचा ढोंगी प्रयत्न विद्यमान सरसंघचालक मोहन भागवत हे करीत असताना दिसतात. हा त्यांच्या भाषणाचा भाग राजकीय निकडीचाच ठरावा असे म्हटल्यास वावगे ठरु नये कारण दसऱ्याचे निमित्त करुन राजकीय पक्षाचे मेळावे आणि त्यात बहुजन ओबीसी समाजासह आंबेडकरी चळवळीतील नेत्यांचे सामाजीक चुली थाटण्याचा प्रयत्न होताना दिसतो आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजीक राजकीय धार्मीक कार्य हे, समानतेचा धागा पकडून होते. त्यानंतर जातीय राजकारणाला हिंदू धर्मीय नेत्यानी राजकीय वळण दिले आणि जाती, जातीच्या उतरंडी निर्माण होवू लागल्या, आणि हिंदू विरुध्द दलित, हा संघर्ष वाढत गेला. कालांतराणे हिंदूत्वाच्या नावाखाली बाळासाहेब ठाकरे यांनी शिवाजी पार्क येथील मैदानावर सभा घेवून शिवसेनेचा हुंकार सोडला. अशा वेळी ही भाजपाच्या प्रमोद महाजन आणि गोपिनाथ मुंडे यांनी शोशल इंजिनिअरींगचा प्रयोग सुरु केला. गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन, हे ओबीसीचे चेहरे बनले. आणि त्यातच छगन भुजबळ यांच्या रुपाने सामाजीक ओबीसी नेतृत्व पुढे आले. अशा काळात विलासराव देशमूख यांचा सारखा मराठा माणूस आणि भाजपीय ओबीसी नेते मुंडे हे परस्पर पुरक साथीदार बनले. आणि सत्ताकारणाच्या पार्श्वभुमीवर एकमेकाचे सख्ये निर्माण झाले. त्यातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा बुलंद सघर्ष आत्मसात करुन दलित पँथर पुढे आली. तर शोशल इंजिअरिंगच्या नावाखाली आंबेडकर चळवळीचा मार्ग बहुजन समाज पार्टीच्या नावावर बहन मायावतीनी पुढे नेण्याचा प्रयत्न केला. परंतू सत्तेच्या लालचीने बसापा आणि पँथर चळवळ हळूहळू नरमाईत गेली. आणि ज्या धुईमुळे आजच्या राजकारणात विजयादशमीच्या निमित्ताने राजकीय मेळावे आणि आपापल्या अस्तित्वासाठी बाबासाहेबांच्या नावावर स्वतःच्या चुली थाटण्याचा जो प्रयत्न होतो आहे, तो धर्मनिरपेक्ष, लोकशाही, समतावादी विचाराला तडा देणारा ठरू शकतो. अशी ही राजकीय वर्तूळात लोकप्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे.

लोकसभा निवडणूकी नतंर विशेषतः महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने प्रधान मंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे महाराष्ट्रातील निवडणूकीवर लक्ष देत असल्यामुळे राजकीय जढाओढीला बहर आलेला दिसतो आहे. कारण भाजपाचे स्वतंत्र मेळावे, देवेंद्र फडणवीस हे मोदी, शहा यांच्या आधारावर घेताना दिसत आहेत, विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शिंदे शिवसेनेसाठी वेगवेगळे मेळावे घेवून शक्ती प्रदर्शन करीत आहेत, तर दुसरी कडे माझीच शिवसेना खरी समजून उध्दव ठाकरे हे स्वतःचे अस्तित्व दाखवण्याची धडपड करीत असताना दिसतात तर भारतीय राजकारणातील चाणिक्य असलेले शरद पवार हे राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला संपवून भाजपा सेनेची सत्ता हस्तगत करण्यासाठी कॉंग्रेसच्या मध्यमातून मोदी, शहा यांना हद्दपार करु पाहात आहेत. त्यामूळे महायुती आणि इंडिया महाविकास आघाडीतील राजकीय सत्तासंघर्ष प्रकृर्षाने जाणवताना दिसते आहे.

आजघडीला महाराष्ट्राची आर्थिक स्थिती गंभीर असताना विधानसभा निवडणूका डोळ्यासमोर ठेवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे विविध योजना जाहिर करुन त्या कार्यान्वीत करीत आहेत. तर दुसरीकडे जातनिहाय महामंडळे स्थापन करुन जाती, जाती धर्मा, धर्मात तेढ निर्माण करुन विधानसभा स्वतःच्या ताब्यात ठेवण्यासाठी धडपड करीत असताना दिसतात. त्यामूळे दसरा विजयादशमीच्या निमित्ताने सर्वपक्षीय सत्तेचे राजकारण सत्तापदासाठी हापापलेले दिसते आहे. विविध योजना आणि महामंडळे निर्माण करुन माणसा, माणसात जातीय दरी निर्माण करुन फुले, शाहू, आंबेडकर यांच्या महाराष्ट्राला जात्याधं आणि धर्माधं शक्तीच्या कचाट्यात महाराष्ट्राच्या संस्कृतीक राजकीय सामाजीक वैभवाला शिंदे, फडणवीस, अजित पवार डंख मारु पाहात आहेत की काय, अशी ही उलटसूलट प्रतिक्रिया समाज माध्यमातून व्यक्त होताना दिसते आहे.

कारण विजयादशमीच्या निमित्ताने शिवसेनेचे दोन मेळावे, पंकजा मुंडे आणि धनजंय मुंडे यांचा एक मेळावा, जरांगे पाटील यांचा एक मेळावा, राष्ट्रीय स्वंयसेवक संघ आणि दिक्षाभुमीतील परंपरागत प्रत्येकी एक, एक मेळावा आणि राज ठाकरे यांचा कोपऱ्यातला अर्धवट मेळावा असे सहा, सडोसहा मेळावे पार पडले तर इकडच्या तिकडच्या दोन्ही डगरीवर हात ठेवून राजकीय दुर्वाभौवती फिरणारे प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले, आ, बच्चूकडू आदिंचे मेळावे नाहीत. परंतू त्यांच्या, त्यांच्या वेगवेगळ्या सामाजीक चुली आहेतच मग सत्ताकारणासाठी दसरा आणि विजयादशमीचे निमित्त करुन वेगवेगळे राजकीय मेळावे आणि सामाजीक चुली मांडणाऱ्या नेत्याना महाराष्ट्र घडवायचा आहे की बुडवायचा आहे, हे उद्याच्या विधानसभा निवडणूक निकालावरुन स्पष्ट होईल. असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

# वाचन प्रेरणा दिन

आज १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. वाचन आणि लेखन आवडणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस संपूर्ण देशात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतःला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश महासत्ता कसा बनेल असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ अब्दुल कलाम करत असत. अब्दुल कलाम यांनी १९९६ साली इंडिया २०२० हे पुस्तक लिहिले. याच पुस्तकाच्या आधारे तेंव्हाच्या नियोजन आयोगाने व्हिजन २०२० तयार केले. डॉ अब्दुल कलाम यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले त्यात त्यांनी बालपणापासून राष्ट्रपती बनण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. डॉ अब्दुल कलाम यांनी एकूण २४ पुस्तके लिहिली असून त्यातील बहुतांशी पुस्तके विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच लिहीली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे असा त्यांचा आग्रह होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो असे त्यांचे मत होते. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे ते नेहमी म्हणत.

आजचा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे आजच्या मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी वाचनाची आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया व इंटरनेटच्या युगात पुस्तक वाचनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमधील अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एकाच जागी धूळ खात पडत आहेत. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे.

आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरून चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शाळा महाविद्यालयात हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा केली जाते. आजच्या दिवशी शाळा महाविद्यालयात तसेच सरकारी आस्थापनात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एक पुस्तक पुस्तके भेट द्यावे. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक वाचावे.

वाचन प्रेरणा दिन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे, याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्याने आपली ग्रहण क्षमता आणि स्मरण शक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर, चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात. त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्त्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे.

मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टकोन कायमचा बदलतो. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा – कादंबरी वाचनाने वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्रे वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या मुलांना खूप ताण असतो. हा ताण कमी करण्याचे प्रभावी मध्यम म्हणजे वाचन.

एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो त्यांच्यात नैतिकतेची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातील नैतिक मूल्ये हरवत चालली आहेत त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवी. त्यासाठी वाचन प्रेरणा दिन यासारखे उपक्रम नक्कीच उपयोगी ठरेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# लक्ष्मी ग्रँड हे मंगल कार्यालय नसून फाईव्ह स्टार बँक्वेट हॉल आहे : आ. अमित देशमुख

लातूर : लातूर शहरात सुरु करण्यात येत असलेले लक्ष्मी ग्रँड मंगल कार्यालय हे कोणत्याही बाजूने मंगल कार्यालयाच्या परिभाषेत बसत नसून सर्व सोयी – सुविधांनी परिपूर्ण असणारे हा फाईव्ह स्टार बँक्वेट हॉल असल्याचे गौरवोद्गार माजी मंत्री आ. अमित देशमुख यांनी काढले.



लातूरचे यशस्वी उद्योजक दीपक कोटलवार यांच्या लक्ष्मी ग्रँड या नूतन मंगल कार्यालयाचे उद्घाटन रविवारी सायंकाळी आ. अमित देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा. डॉ. शिवाजी काळगे हे होते. यावेळी मंचावर आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेकर, आर्य वैश्य महासभा बांधकाम समितीचे अध्यक्ष भानुदास वट्टमवार, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष एड. किरण जाधव, हरिभाऊ कोटलवार, दिपक कोटलवार, आकाश कोटलवार, क्रेडाईचे अध्यक्ष जगदीश कुलकर्णी, दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी, संजय निलेगावकर, उद्योजक सुरेश पेन्सलवार , दिलीप माने, व्यंकटेश पुरी, संगम कोटलवार, राम स्वामी आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. अमित देशमुख यांनी देशमुख आणि कोटलवार परिवारात मागच्या तीन पिढ्यांपासून कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध असल्याचे सांगितले. स्व. विलासराव देशमुख आणि हरिभाऊ कोटलवार हे दोघेही जिवलग मित्र होते. त्यावेळी एक वेगळीच क्रेज असलेल्या जावा मोटारसायकलवरून ते दोघेही फिरत असत, अशी आठवणही त्यांनी काढली. स्व. विलासराव देशमुख नेहमी म्हणत असत ' जे जे नवं – ते लातूरला हवं ' . त्याप्रमाणे लातूरला हवं असणारे सारे काही नवं या अत्याधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण अशा या बँक्वेट हॉल च्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. लातुरात सध्या अनेक मंगल कार्यालयांची उभारणी होताना दिसत असून येणाऱ्या काळात हे मंगल कार्यालयांचे शहर म्हणून ओळखले जाते की काय असे वाटते. लातूरकरांना सगळ्याच स्वातंत्र्याची मुभा

विलासराव देशमुखांनी दिली होती. त्यामुळे लातूरचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली. यापुढील काळातही लातूर यापेक्षाही अधिक वेगाने विकासाच्या दिशेने मार्गोत्क्रमण करेल, असा विश्र्वासही आ. देशमुख यांनी व्यक्त केला. लातूरला वंदे भारत रेल्वे आली पाहिजेयासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. राज्यात अनेक शहरात विमानसेवा सुरु झालीय. लातुरातही ती लवकरच सुरु होईल. लातूरची कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम आपल्या सर्वांच्या माध्यमातून चांगले होत आहे. लातूरची संस्कृती जपण्याचे काम आपण सर्वांनी केले पाहिजे असे सांगून त्यांनी कोटलवार कुटुंबियांच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना खा. डॉ. काळगे यांनी दीपक कोटलवार हे माझे वर्गमित्र असून त्यांच्या मुलाने सुरु केलेला हा उपक्रम पाहून आपल्यालाही खूप आनंद झाल्याचे सांगितले. या मंगल कार्यालयामुळे लातूरच्या वैभवात नक्कीच भर पडेल असा विश्र्वासही खा. डॉ. काळगे यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक कोटलवार यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या मंगल कार्यालयाच्या उभारणीमागची संकल्पना विशद केली. लॉन्स, प्रशस्त डायनींग – पार्किंग सुविधा, प्रशस्त अशा ३४ वातानुकूलित खोल्या या मंगल कार्यालयाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी नंदकुमार गादेकर, भानुदास वट्टमवार, जगदीश कुलकर्णी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संजय जेवरीकर यांनी तर आभार प्रदर्शन युवा उद्योजक आकाश दीपक कोटलवार यांनी केले. कार्यक्रमास लातूर शहर परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन...

## दहा हजार वर्षात ....

ती व्यक्ती मुंबईतील हत्येची सूत्रधार आहे. गुजरातमध्ये बसून मुंबईत उद्योगधंदे पळवायचे, मुंबईतील मराठी माणसाला त्रास द्यायचा, आमच्या मुंबईतल्या माणसांची हत्या करायची हे सगळं गुजरातमधून होत आहे. तुमच्या गुजरातमधील तुरुंगातला गँगस्टर आमच्या महाराष्ट्रातल्या राजकीय नेत्याची हत्या करतो. तरी तुम्ही ती थांबवू किंवा रोखू शकत नाही. खरं तर हे प्रकरण एवढ मोठं आहे की, केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी संजय राऊतांनी केली.

पवारांनीच राजीनामा मागितला पाहिजे – मुंबईत अजित पवारांच्या एका राजकीय नेत्याची हत्या होते. परंतु अजित पवार काहीही करू शकत नाहीत. निषेध व्यक्त करण्यापलीकडे काही करू शकत नाहीत. राजकारणात निषेध व्यक्त करणे हे गोंपणाचे लक्षण आहे. अशी खरमरीत टीका राऊतांनी अजित पवारांवर केली. खरं म्हणजे अजित पवार यांनीच मुख्यमंत्र्यांचा राजीनामा मागितला पाहिजे होता. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था मोडून पडली आहे. आणि त्याच मंत्रिमंडळात अजित पवार बसले आहेत. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणून काही करू शकत नाहीत. या राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचे तीन तेरा वाजले आहेत. आज सामान्य माणसालाही घराबाहेर पडताना भीती वाटत आहे. कुठूनही गोळी येईल, कोयता गँग वार करेल, असं मुंबई, पुण्यात भीतीदायक चित्र असल्याचं संजय राऊत म्हणाले.

सरकारच गुंडांचा वापर करतंय – हे सरकार गुंडांचा वापर करत आहे. या सगळ्या गुंडांचा वापर एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस राजकारणासाठी करताहेत. एकनाथ शिंदेंनी तर गुंडांच्या टोळ्या पोसल्या आहेत. पोलीस खात्यात आणि बाहेर सुद्धा. लोकसभेत त्यांचा वापर झाला आणि विधानसभेत सुद्धा होईल, असं राऊत म्हणाले. आज गुजरातमधून मोठ्या प्रमाणात ड्रग्ज पकडले आहेत. ५ हजार कोटीचे ड्रग्ज पकडले असतील तर, याच्या आधी ५० हजार कोटीचे ड्रग्ज देशभरामध्ये वाटले असेल. या ड्रग्जच्या पैशातून कोण निवडणुका लढवत आहे आणि कोण राजकारणासाठी त्याचा वापर करतोय. ते सर्वांना माहीत आहे असे राऊत म्हणाले.

